|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re- Accredited
(4th Cycle)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon



संशोधन विभाग

जा. क्र. कबचौउमवि/११/पीएच.डी./१२११/२०२६ दि. ०३/११/२०२६

परीपत्रक क्र. ७२/२०२६

विषय : पीएच. डी. संशोधन कार्यक्रम कालावधी बाबत...

संदर्भ : मा. अधिष्ठाता मंडळ ठराव क्र. बी.ओ.डी.ए-११३/२०२६ दि. १६.१०.२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, कबचौउमवि अंतर्गत पीएच.डी. करीता प्रवेशीत झालेल्या विद्यार्थांनी किमान तीन वर्ष संशोधनाचे कार्य पूर्ण केल्यानंतर (किमान चार सहामाही प्रगती अहवाल आवश्यक) सिनॉप्सीस संदर्भातील कार्यवाही प्रचलित कार्यपध्दतीनुसार करण्यात येते.

या अनुषंगाने मार्गदर्शक, संशोधक विद्यार्थ्यी यांना अधिक सुस्पष्टता येण्याकरीता मा. अधिष्ठाता मंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारीत केला आहे

अधिष्ठाता मंडळ ठराव क्र. बी.ओ.डी.ए-११३/२०२६ दि. १६.१०.२०२६

क) विद्यापीठ परीपत्रक ५८/२०२४ मध्ये नमुद करण्यात आलेला Duration चा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे.

Ph.D. Program हा Registration दिनांकापासून तीन वर्षाचा राहील याचा अर्थ संशोधन Program असा असुन विद्यार्थ्यांनी Synopsis हे नोंदणी दिनांकापसून तीन वर्षानंतर (किमान चार सहामाही प्रगती अहवालानंतर) सादर करावेत.

ख) पीएच.डी. विभागाच्या डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवीप्रदान करण्याबाबतचे नियम व कार्यपध्दतीबाबत विद्यापीठाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या विविध अधिसुचना व विद्वत परिषदेचे त्या अनुषंगाने संमत झालेल्या ठरावांनुसार संशोधकास प्रवेश/नोंदणी दिनांकापासून किमान तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच संशोधन सारांश (Synopsis) सादर करण्यास पात्र मानण्यात येईल, तसेच पीएच.डी. नियमावलीतील इतर सर्व विहित अटी व शर्तीची पूर्तता केलेली असणे आवश्यक राहील.

पीएच.डी नियमावली एक समान, सुसंगत व पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व संशोधन सारांश सादर करण्याच्या पात्रतेबाबत उद्भवू शकणारी संदिग्धता दूर करण्यासाटी हे स्पष्टीकरण निर्गमीत करण्यात येत आहे.

तेव्हा उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सर्व संबधित मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांनी सिनॉप्सीस संदर्भात कार्यवाही करावी ही विनंती.

आदेशान्वये,

सहा. कुलसचिव (से.नि.)

प्रति,

१. सर्व पीएच.डी. मार्गदर्शक कबचौउमवि, जळगाव

२. सर्व संशोधक विद्यार्थी (पीएच.डी.), कबचौउमवि, जळगाव

प्रत- १. मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

३. मा. सर्व अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता, कबचौउमवि, जळगाव

४. मे. निर्मल सॉफ्टवेअर, नागपूर